# समर्पिता

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A38

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**समर्पिता : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ २००/-

# समर्पिता

# दोन शब्द

अगदी परवा-परवाची – म्हणजे दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट.

रस्त्यात लीलाबाई भेटल्या. गडबडीत दिसल्या. मी हसून सहज विचारलं,

''बेबीच्या लग्नाच्या गडबडीत असाल. तारीख ठरली का?''

त्यांचा चेहरा एकदम पडला. त्यांनी जड स्वरात म्हटलं,

''नाही. ते लग्न मोडलं...''

''मोडलं? म्हणजे?... सगळं निश्चित झालं होतं ना? साखरपुडा- याद्या?''

''हो, पण लग्नात मोडता घालणारे विघ्नसंतोषी लोक असतात ना? कुणी तरी त्यांचे कान भरले... मुलगी मुलांबरोबर हिंडत होती... फार पुढे गेलेली आहे... त्यांना मुलगी धुतल्या तांदळासारखी हवी आहे...''

त्या सांगत होत्या. मी सगळं ऐकत होते. काय बोलावं, सुचत नव्हतं. शेवटी त्यांनीच म्हटलं,

''जाऊ दे. हा योग नव्हता. आमच्या नशिबी नव्हतं.''

त्या निघून गेल्या तरी मी क्षणभर तशीच तिथे खिळून उभी होते. जणू काहीतरी अघटित कानी पडलं होतं!...

... आज घडीला- स्त्रीस्वातंत्र्याच्या युगात – स्त्रीमुक्तीच्या वर्तमानकाळात एका सुशिक्षित पदवीधर, गृहकृत्यात कुशल, दिसायला नीटस विवाहेच्छू मुलीची ही अवस्था?...

... म्हणजे आज स्त्री स्वतंत्र – मुक्त होऊनसुद्धा तिच्या विवाहाचा प्रश्न सुटलाच नाही. जुन्या पौराणिक काली होता तसा तो आजही आहे. उलट आज या प्रश्नाला विकृत रूप येत चाललंय.

विवाह म्हणजे स्त्रीच्या जीवनाचा गाभा. संसार– जीवनाचा गाभारा. पौराणिक कालापासून आतल्या सजीव मूर्तीसह मजबूत शृंखलांनी (हुंडा– आसुरी मागण्या, अनन्वित छळ... किती शृंखला?) जखडलेला हा बंदिस्त गाभाराच जर अजूनही उघडलेला नाही – मोकळा झालेला नाही. तर मग स्त्री स्वतंत्र कशी? ती मुक्त कशी?..

... स्त्रीची– (कुठल्याही सजीव प्राण्याची) खरी मुक्ती कशात आहे? तिचं खरं स्वातंत्र्य कशात आहे?...

महाभारतातल्या 'अंबा'ची कथा आठवली. आज इतकी युगे लोटली. आम्ही विज्ञानयुग ओलांडून पुढे चाललो आहोत. पण 'स्त्री' च्या अवस्थेत काही बदल झाला आहे का?... तिचा मूलभूत प्रश्न सुटला आहे का?

म्हणूनच 'अंबा' हिची कथा लिहिण्याचा मी प्रपंच केला आहे.

आपण कोण आहोत याची – म्हणजेच आपल्या आत्मशक्तीची आमच्या स्त्रीला जाणीव व्हावी, स्त्री स्वातंत्र्याचा – स्त्री मुक्तीचा सखोल अर्थ तिच्या ध्यानी यावा.

इति!

...२...

दुसरी कथा – शकुंतला. या प्रणयरम्य कथेचा मूळ गाभा – कुमारी माता!

कुमारी मातेचा प्रश्न आजही सुटलेला नाही. ठामपणे तसाच उभा आहे. बदलत्या काळाबरोबर काही नैतिक मूल्ये – कित्येक जुन्या रूढी बदलल्या. त्यांना पर्याय निर्माण झाले. पण कुमारी मातेच्या बाबतीत अजूनही समाजाची दृष्टी बदलली नाही. कुमारी मातेची स्थिती पालटली नाही.

स्त्रीच्या खऱ्या जीवनाला स्पर्श करणारा, तिच्या अंतर्यामाशी निगडित असणारा हा प्रश्न सुटलेला नाही. त्यातून नव्या प्रश्नांची गुंतावळ निर्माण होत आहे. ही गुंतावळ मन अस्वस्थ करणारी आहे.

...३...

त्या दिवशी सकाळी काही व्हिजिट्स उरकून मी हॉस्पिटलकडे येत होते.

विठोबाच्या मंदिराच्या प्राकारात डावीकडे असलेल्या भल्या मोठ्या शतायुषी वटवृक्षाच्या उंच दगडी पारावर स्त्रियांची दाटी झाली होती. भटजींचे पूजा मंत्रोच्चार चालू होते. काही स्त्रिया पूजेत गुंतल्या होत्या. काही स्त्रिया त्या महाकाय वटवृक्षाच्या बुंध्याभोवती सुतांचे वेढे फिरवीत प्रदक्षिणा घालीत होत्या. खरंच! आज 'वटपौर्णिमा' होती. या जन्मीचा पतीच जन्मोजन्मी मिळावा म्हणून त्या वटवृक्षाला सूत्रबद्ध करून ठेवीत होत्या.

ते दृश्य नजरेखाली घालीत दवाखान्यात आले, तेव्हा पेशंट्स माझी वाट पाहात बसले होते - काही हाती केसपेपर घेऊन उभेच होते. दवाखान्यात येता येता पलीकडच्या कपिलतीर्थ मंडईतून भाजी घेऊन येणे त्यांना सवडी- सोईचे. आज त्यांच्या बास्केट्समध्ये पिशव्यात भाजीबरोबर वडाच्या डहाळ्या दिसत होत्या.

मला पाहताच सरलाबाईंनी घाईघाईने म्हटलं,

''डॉक्टर आज जरा लवकर औषध द्या. स्वंयपाक, पूजा सगळं उरकून धावत पळत शाळा गाठायची आहे. अमिनचा ताप कमी झालाय, बाकी सगळं ठीक आहे.''

केसपेपरवर औषध लिहून तो त्यांच्या हाती देत हसत म्हटलं,

''तुम्ही बी.ए.बी.एड. एक आदर्श शिक्षिका आणि अगदी धावत पळत वडाच्या डहाळीची पूजा करता.''

''पण शिक्षणाचा आणि व्रत-वैकल्यांचा काय संबंध?''

दुसरीने म्हटलं, ''अहो, शिक्षण घेतलं आणि नोकऱ्या केल्या म्हणून व्रतं सुटतात का?''

सरलाबाईंनी म्हटलं, ''आणि सावित्रीचं व्रत हे तर स्त्रियांचं मुख्य व्रत. वडावर जायला फुरसत नाही-''

मी हसून मध्येच म्हटलं, ''म्हणून वडालाच पकडून घरी पुजायला नेता?''

...व्रत सोडता येत नाही - (अशी समजूत) म्हणून ते करायचं.

सावित्रीची कथा काय आहे? महाभारत उघडलं. सावित्रीची जीवनकथा वाचली.

महाभारतातल्या सावित्रीच्या कथेत वटवृक्ष- वट डहाळी कुठं नाही. पुराणातल्या आख्यानात ती असावी. विविध पुराण ग्रंथांत असलेल्या सावित्रीच्या कथेतल्या तपशिलात थोडा फार फरक असला तरी त्यातलं तत्त्व एकच आहे-

– स्वत:च्या चिकित्सक मनाला जे पटतं ते डोळसपणे स्वीकारणे आणि जे एकदा स्वीकारले त्यावर अचल निष्ठा ठेवणे. अक्षय वटवृक्ष हे त्या निष्ठेचं प्रतीक आहे.

–स्त्रीच्या अक्षय निष्ठेचं– तिच्या आत्मशक्तीचं सामर्थ्य साक्षात मृत्यूलाही जिंकून घेतं हा या कथेचा गाभा आहे.

पण निष्ठा ही नेहमी अन्योन्य (Reciproeal) असावी लागते. ती तशी असेल तरच अशा निष्ठेला सुखद सुमधुर फळे येतात. ती सतत वृद्धिंगत होत राहते. एकतर्फी निष्ठा ही नेहमी निष्फळ वांझोटी असते.

सावित्रीची कथा ही समर्पित जीवनाची कथा आहे.

महाभारतातल्या या तीन कथा आजही कालबाह्य झालेल्या नाहीत. जोपर्यंत स्त्रीचे मूलभूत प्रश्न सुटणार नाहीत, तोपर्यंत त्या कालबाह्य होणारही नाहीत.

प्रतिज्ञा (अंबा), स्वयंसिद्धा (शकुंतला) आणि समर्पिता (सावित्री) – स्त्रीची ही तीन स्वयंभू रूपे आहेत असं या मूळ कथा वाचताना मला जाणवलं म्हणून त्या वाचकांपुढे ठेवीत आहे.

महाद्वार मार्ग
कोल्हापूर — **सुमती क्षेत्रमाडे**
२१/८/८३

## कथानुक्रम


- अंबा (पूर्वार्ध) ....... ११
- अंबा (उत्तरार्ध) ....... ५७
- सावित्री ....... १०५
- शकुंतला ....... १५३


+++